प्रेस नोट

समतानगर पोलीस ठाणे, मुंबई

**विषय:-पोईसर, कांदिवली परिसरामध्ये दहशत माजविलेल्या यमेश दिलीप दरेकर उर्फ दादा या टोळी गुंडाविरुध्द मकोकाची कारवाई**

समतानगर पोलीस ठाणे हद्दीत दिनांक १५/०६/२०२६ रोजी रात्री सुमारे ००.३० वाजता फिर्यादी नामे अ.ब.क., रा., पोयसर, कांदिवली पूर्व, मुंबई, यास आरोपींनी हप्ता न दिल्याच्या कारणावरून त्याचे कपडे उतरवून शिवीगाळ केली. तसेच लोखंडी रॉड, लाकडी स्टंप व लाथाबुक्क्यांनी त्यास मारहाण केली. आरोपी यमेष दिलीप दरेकर याने फिर्यादीस जीवे ठार मारण्याची धमकी देऊन त्याच्या डोक्यात लोखंडी रॉडने मारहाण करून गंभीर दुखापत केली. फिर्यादीने आरडाओरड केल्यानंतर तेथे जमा झालेल्या नागरिकांनाही आरोपींनी जीवे मारण्याची धमकी दिली. या घटनेवरून समतानगर पोलीस ठाणे येथे दिनांक १५/०६/२०२६ रोजी गु.र.क्र. ६९९/२०२६, कलम १०९, १४०(१), ३०८(४), १११(२), १११(४), १८९(२), १८९(४), १९०, ११५(२), ३५२, ३५१(३) भा.न्या.सं. तसेच कलम ३७(१)(अ), १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

सदर गुन्ह्यात आरोपी १) रोहित कृष्णप्रताप सिंग, वय ३३ वर्षे २) सागर अनिल राठोड, वय २२ वर्षे यांना दिनांक १५/०६/२०२६ रोजी अटक करण्यात आली आहे. सध्या ते न्यायालयीन कोठडीमध्ये आहेत. सदर गुन्ह्यातील मुख्य आरोपी यमेष दिलीप दरेकर उर्फ दादा हा सध्या फरार असून त्याचा शोध घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

**आरोपीतांची गुन्हेगारी पार्श्वभूमी:-**


**१) यमेश दिलीप दरेकर उर्फ दादा** - हा सराईत गुन्हेगार असून त्याचे विरूध्द समतानगर पोलीस स्टेशन येथे गंभीर स्वरूपाचे एकूण ३७ गुन्हे दाखल आहे. यमेश दरेकर याने मुंबई शहरामध्ये गुन्हे त्याची दहशत माजवली असून गुन्हा करताना शस्त्र जवळ बाळगणे, जिवे ठार मारण्याचा प्रयत्न करणे, मृत्यु व जबर दुखापत घडवुन आणण्याचा प्रयत्न करुन जबरी चोरी करणे, घातक हत्याराचा धाक दाखवुन जबरी चोरी करणे, शिवीगाळ करून मारहाण करणे,विनयभंग करणे, शांतता भंग घडवुन आणण्याच्या उद्देशाने अपमान करणे, इच्छापुर्वक गंभीर दुखापत करणे, फौजदारी पात्र कट रचणे, जिवे ठार मारण्याची धमकी देणे, दुखापत व हमला करण्याच्या उद्देशाने गृह अतिक्रमण करणे अशा प्रकारचे गंभीर गुन्हे केल्याने त्याची पोयसर, गांवदेवी परिसरात दहशत माजवली आहे त्याचे विरूध्द यापुर्वी समतानगर पोलीस ठाणे मार्फत **दोन वेळा MPDA** अन्वये स्थानबध्द व **दोन वेळा तडीपारची** कारवाई करण्यात आली आहे.

**२) रोहित कृष्णप्रताप सिंग -** हा देखील यमेश दरेकर याचे टोळीचा सदस्य असून त्याने यमेश दरेकर याचेसमवेत घातक हत्याराचा धाक दाखवुन जबरी चोरी करणे, शिवीगाळ करून मारहाण करणे, इच्छापुर्वक गंभीर दुखापत करणे, जिवे ठार मारण्याची धमकी देणे, दुखापत व हमला करण्याच्या उद्देशाने गृह अतिक्रमण करणे, विनयभंग करणे या प्रकारचे गंभीर गुन्हे केले असून त्याचे विरुध्द एकूण १३ गुन्हे दाखल आहेत. नमुद आरोपीविरुध्द वेळोवेळी प्रतिबंधक कारवाई करण्यात आली आहे.

**३) सागर अनिल राठोड** - हा देखील यमेश दरेकर याचे टोळीचा सदस्य असून त्याने यमेश दरेकर याचेसमवेत शिवीगाळ करून मारहाण करणे, इच्छापुर्वक गंभीर दुखापत करणे, जिवे ठार मारण्याची धमकी देणे, दुखापत व हमला करण्याच्या उद्देशाने गृह अतिक्रमण करणे गुन्हे केले असून त्याचेवर २ गुन्हे दाखल आहेत. तसेच सन २०२३ मध्ये कलम १०७ फौदप्रस अन्वये कारवाई केली

आरोपी यमेश दिलीप दरेकर उर्फ दादा याने विविध गुन्हेगारांना एकत्र करून संघटित गुन्हेगारी टोळी निर्माण केली असून, तो सदर टोळीचा प्रमुख म्हणून कार्यरत आहे. सदर टोळीच्या माध्यमातून मुंबई शहरात दहशत व वर्चस्व निर्माण करून आर्थिक फायदा मिळविण्याच्या उद्देशाने हिंसाचाराचा वापर करून विविध बेकायदेशीर कृत्ये सातत्याने करत आहे त्यामुळे मुख्य आरोपी यमेष दिलीप दरेकर उर्फ दादा व त्याच्या टोळीविरुद्ध महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम, १९९९ अंतर्गत कारवाई करण्यासाठी मा. श्री. गजानन शिवलिंग राजमाने, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०३, मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली प्रस्ताव तयार करून मा. अपर पोलीस आयुक्त, उत्तर प्रादेशिक विभाग यांचेकडे सादर करण्यात केला असता मा.अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशि विभाग (अतिरिक्त कार्यभार उत्तर प्रादेशिक विभाग) यांनी महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम, १९९९ मधील कलम ३(१)(ii), ३(२) व ३(४) चा अंतर्भाव करण्यास परवानगी दिली आहे. त्यामुळे यमेश दिलीप दरेकर यांचेविरूध्द समतानगर पोलीस स्टेशन दाखल असलेल्या गुन्हयामध्ये **MCOCA अंतर्गत कारवाई केली आहे.** सदर गुन्ह्याचा पुढील तपास मा. सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. कैलास बर्वे हे करीत आहेत.

समतानगर पोलीस ठाणे हद्दीत संघटित गुन्हेगारी, खंडणी, दहशत निर्माण करणाऱ्या टोळ्या व गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येत असून, अशा प्रकारच्या गुन्हेगारी कृत्यांना आळा घालण्यासाठी पोलीसांकडून सातत्याने प्रभावी प्रतिबंधात्मक व कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
|  |  |  |
| यमेश दिलीप दरेकर | रोहित कृष्णप्रताप सिंग | सागर अनिल राठोड |